दैनिक सिध्देश्वर नगरी
Email :dailysiddheshwarnagari@gmail.com

# लोकमंगल नर्सिंग कॉलेजमार्फत मोफत नेत्र तपासणी व रक्त तपासणी

**सोलापूर :** वडाळा ता.उत्तर सोलापूर येथील श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान अंतर्गत लोकमंगल हॉस्पिटल, यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने गुळवंची येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मोफत नेत्र तपासणी व रक्त तपासणी शिबिराचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले.

या आरोग्य शिबिरामध्ये नेत्ररोग तज्ञ डॉ.इंगळे आणि डॉ. वैशाली यांनी उपस्थित राहून नागरिकांची मोफत नेत्र तपासणी केली. तसेच डोळ्याच्या विविध आजाराबाबत मार्गदर्शन केले . यावेळी नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी यांनी शिबिराच्या नियोजनापासून ते अंमलबजावणी पर्यंत मोलाचे सहकार्य केले.




शिबिरामध्ये गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून मोफत नेत्रा तपासणी व रक्त तपासणीचा लाभ घेतला. विशेष म्हणजे जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी यांनी देखील या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली.

विद्यार्थ्यांनी डोळ्याची योग्य काळजी कशी घ्यावी नेहमी तपासणीचे महत्त्व तसेच आरोग्य विषयक सवयी बाबत मार्गदर्शन करण्यात आले गुळवंची ग्राम स्थांनी लोकमंगल हॉस्पिटल आणि लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने असे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लोकमंगल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी शिक्षक वर्ग तसेच सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले भविष्यातही अशा प्रकारचे समाज उपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



**वडाळा (ता. उत्तर सोलापूर) : लोकमंगल नर्सिंग कॉलेजमध्ये व्याख्यानप्रसंगी उपस्थित महेंद्र बिरादार, प्राचार्य बाळासाहेब बिराजदार व अन्य मान्यवर.**

# नर्सिंगमधील समस्या, आव्हानांवर मार्गदर्शन

**सोलापूर :** वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील लोकमंगल नर्सिंग कॉलेजमध्ये 'नर्सिंग व्यवसायातील समस्या व आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. या कार्यक्रमात महेंद्र बिरादार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी नर्सिंग व्यवसायातील विविध समस्या, आव्हाने तसेच आधुनिक आरोग्यसेवा क्षेत्रातील नर्सेसची भूमिका यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे अनुभवही विद्यार्थ्यांसमोर मांडले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना नर्सिंग क्षेत्राविषयी नवी दिशा व प्रेरणा मिळाल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राचार्य बाळासाहेब बिराजदार, इनामदार, आवारे तसेच महाविद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन स्नेहल कोरके यांनी केले.

Solapur, Solapur-Today
06/06/2026 Page No. 4



वडाळा (ता. उत्तर सोलापूर) : व्याख्यानाच्या शुभारंभप्रसंगी डॉ. मनीषा शिंदे, प्राचार्य बाळासाहेब बिराजदार, फौजिया मुल्ला.

# लोकमंगल महाविद्यालयात 'फॉरेन्सिक नर्सिंग'वर व्याख्यान

**सोलापूर, ता. ३० :** वडाळा (ता. उ. सोलापूर) येथील लोकमंगल नर्सिंग कॉलेजमध्ये मेडिको लिगल केस आणि फॉरेन्सिक नर्सिंगवर व्याख्यान झाले.

ट्रेनिंग कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या तथा महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या सदस्या डॉ. मनीषा शिंदे यांनी मेडिको लीगल केसेस व फॉरेन्सिक नर्सिंग य[illegible] विषयांचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले[illegible] यावेळी प्राचार्य बाळासाहेब बिरादार, प्रा[illegible] सुदर्शन आवारे, फौजिया मुल्ला उपस्थि[illegible] होते. स्नेहल कोरके यांनी आभार मानले.

Solapur, Solapur-Today
01/05/2026 Page No. 102

दैनिक सोलापूर

# कटूसत्य

www.katusatyanews.com

epaper.katusatyanews.com
03 Jun 2026 - Page 4

# लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून 'पोषणाचे महत्त्व' जनजागृती कार्यक्रम

**धाराशिव (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत संचालित लोकमंगल नर्सिंग कॉलेज, वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील विद्यार्थ्यांनी काटी गावात 'समृद्ध गाव योजना' अंतर्गत "Importance of Nutrition (पोषणाचे महत्त्व)' या विषयावर आरोग्य शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये संतुलित आहार, पोषण आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरी जाऊन नागरिकांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केले तसेच पोषणयुक्त आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर गावाच्या मुख्य चौकात रॅली काढून घोषणाबाजी (स्लोगन) करत जनजागृती करण्यात आली.



विद्यार्थ्यांनी संतुलित आहार, फळे, भाज्या, कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ यांचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व, कुपोषणाचे दुष्परिणाम तसेच योग्य आहारामुळे होणारे आरोग्यदायी फायदे याबाबत सविस्तर माहिती दिली. पोषणाविषयी जनजागृती ही निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमास लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार, इनामदार सर, फौजिया मुल्ला मॅडम, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या सामाजिक व आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य व पोषणविषयक माहिती पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



वडाळा (ता. उत्तर सोलापूर) : लोकमंगल विद्यापीठाच्या वर्धापनप्रसंगी विद्यार्थी.

# लोकमंगलमध्ये विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात

सोलापूर : वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत लोकमंगल नर्सिंग कॉलेजमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा स्थापना दिन साजरा झाला. विद्यापीठाचे कुलगीत वाजवून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर महाविद्यालय परिसरात विद्यापीठाचा ध्वज फडकावून त्यास सलामी देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब बिरादार, फौजिया मुल्ला आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे उद्दिष्ट, कार्य, विविध शैक्षणिक अभ्यासक्रम तसेच आरोग्य क्षेत्रातील योगदान याबद्दल मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. बिरादार यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेतील योगदान, आरोग्य शिक्षणातील भूमिका याबद्दल माहिती दिली.

Solapur, Solapur-Today
19/06/2026 Page No. 3



**काटी (ता. तुळजापूर) :** पोषणाचे महत्व याबद्दल जनजागृती करताना लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी.

# पोषणाच्या महत्त्वावर विद्यार्थ्यांकडून जनजागृती

**सोलापूर :** वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी काटी (ता. तुळजापूर) येथे 'समृद्ध गाव योजना' अंतर्गत पोषणाचे महत्त्व या विषयावर आरोग्य शिक्षण कार्यक्रम आयोजित केला. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरी भेट देऊन नागरिकांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केले व संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर मुख्य चौकातून जनजागृती रॅली काढण्यात आली. फळे, भाज्या, कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व, कुपोषणाचे दुष्परिणाम आणि योग्य आहाराचे फायदे याबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य बाळासाहेब बिरादार, फौजिया मुल्ला, प्राध्यापक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

Solapur, Solapur-Today
05/06/2026 Page No. 3

दैनिक सोलापूर

# कटूसत्य

epaper.katusatyanews.com
03 Jun 2026 - Page 4

# लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून 'पोषणाचे महत्त्व' जनजागृती कार्यक्रम

**धाराशिव (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत संचालित लोकमंगल नर्सिंग कॉलेज, वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील विद्यार्थ्यांनी काटी गावात 'समृद्ध गाव योजना' अंतर्गत "Importance of Nutrition (पोषणाचे महत्त्व)' या विषयावर आरोग्य शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये संतुलित आहार, पोषण आणि निरोगी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरी जाऊन नागरिकांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केले तसेच पोषणयुक्त आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर गावाच्या मुख्य चौकात रॅली काढून घोषणाबाजी (स्लोगन) करत जनजागृती करण्यात आली.



विद्यार्थ्यांनी संतुलित आहार, फळे, भाज्या, कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ यांचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व, कुपोषणाचे दुष्परिणाम तसेच योग्य आहारामुळे होणारे आरोग्यदायी फायदे याबाबत सविस्तर माहिती दिली. पोषणाविषयी जनजागृती ही निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमास लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार, इनामदार सर, फौजिया मुल्ला मॅडम, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या सामाजिक व आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य व पोषणविषयक माहिती पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सकाळ



**वडाळा (ता. उत्तर सोलापूर) :** वीर बाल दिवस साजरा करताना लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींसोबत बाळासाहेब बिराजदार, **वैशाली साठे आदी.**

# लोकमंगल कॉलेजतर्फे वीर बाल दिवस साजरा

**सोलापूर, ता. १८ :** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल नर्सिंग कॉलेज यांच्या वतीने वीर बाल दिवस साजरा झाला.

वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार, नर्सिंग कॉलेजचे इतर शिक्षक, न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या वैशाली साठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

Solapur, Solapur-Today
19/01/2026 Page No. 7

सकाळ




वडाळा (ता. उ. सोलापूर) : जनजागृती उपक्रमात विद्यार्थ्यांसोबत सचिवा अनिता ढोबळे, प्राचार्य बाळासाहेब बिराजदार आदी.

# 'लोकमंगल'तर्फे एचआयव्ही जनजागृती रॅली

■ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ११ : जागतिक एड्स दिनानिमित्त वडाळा (ता. उ. सोलापूर) येथील लोकमंगल नर्सिंग कॉलेजतर्फे एचआयव्ही जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी वडाळा गावात प्रभावी आणि शिस्तबद्ध जनजागृती रॅली काढली. रॅलीनंतर गावात, महाविद्यालयात प्रबोधनपर नाट्यप्रयोग सादर केले.

विद्यार्थ्यांनी एड्स विषयीचे समज-गैरसमज, प्रतिबंधात्मक उपाययोजना, समाजातील कलंक आणि जागरूकतेचे महत्त्व यावर आधारित प्रभावी नाट्य सादर केले. प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल संस्थेच्या सचिवा अनिता ढोबळे, लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार उपस्थित होते. रॅली व पथनाट्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात प्रबोधनपर व्याख्यान झाले. एचआयव्ही/ एड्सची कारणे, प्रतिबंध, उपचारातील प्रगती, सुरक्षित लैंगिक व्यवहार, तसेच समाजाला योग्य माहिती पोचविण्यात नर्सिंग विद्यार्थ्यांची भूमिका याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही प्रश्न विचारत चर्चेत सहभाग नोंदवला.

यावेळी प्राचार्य बिरादार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे उपक्रम सातत्याने आम्ही राबवितो. आरोग्य जनजागृती ही केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक कर्तव्य आहे. या उपक्रमामुळे लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यांकडूनही कौतुक केले.

# लोकमंगल कॉलेजमध्ये महिला सुरक्षिततेबाबत 'निर्भया'तर्फे जनजागृती

वडाळा, ता. ७ : लोकमंगल कॉलेजमध्ये रस्ते सुरक्षा व महिला सुरक्षिततेबाबत विशेष जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर ग्रामीण वाहतूक विभाग व 'निर्भया' पथकाच्या सहकार्याने हा कार्यक्रम झाला.

पोलिस उपनिरीक्षक सुखदेव गोंदे यांनी वाहतूक नियम, हेल्मेट वापर व अपघात प्रतिबंध यावर मार्गदर्शन केले. 'निर्भया' पथकाचे विशाल सावंत यांनी महिला सुरक्षितता, छेडछाड व आपत्कालीन मदतीबाबत माहिती दिली. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रात्यक्षिकांद्वारे शिस्तीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास प्राचार्य सचिन फुगे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजित कुरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. बी. एम. बिरादार यांनी केले.

# 'लोकमंगल नर्सिंग'मध्ये परिचारिका दिन साजरा

उ. सोलापूर : श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत वडाळा येथील लोकमंगल नर्सिंग कॉलेज आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. परिचारिकेच्या जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. सुधा मंगरुळकर व वनमाला शिंदे उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना नर्सिंग क्षेत्राचे महत्त्व, सेवाभाव, रुग्णांप्रती असलेली जबाबदारी तसेच स्वतःच्या कामातील अनुभव याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे विद्यार्थ्यांना नर्सिंग व्यवसायाबद्दल अधिक आत्मविश्वास व प्रेरणा मिळाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य बिराजदार होते. तसेच प्रा. इनामदार, आवारे, फौजिया यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन स्नेहल कोरके यांनी केले. श्वेता यांनी उपस्थितांचे आभार प्रदर्शन केले.

सकाळ



वडाळा (ता. उत्तर सोलापूर) : प्रतिमा पूजनप्रसंगी प्रा. सागर महाजन, बाळासाहेब बिराजदार, अथरअली इनामदार, प्रफुल्ल सूर्यवंशी, स्नेहल कोरके.

# 'लोकमंगल'मध्ये राष्ट्रीय युवा दिन, जिजाऊंची जयंती

सोलापूर : राष्ट्रीय युवा दिन व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील श्रीराम ग्रामीण संस्था व विकास प्रतिष्ठान अंतर्गत असलेल्या लोकमंगल नर्सिंग कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम झाले. या कार्यक्रमास लोकमंगल कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सागर महाजन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्राचार्य बाळासाहेब बिराजदार व प्रमुख पाहुणे प्रा. सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अथरअली इनामदार, प्रफुल्ल सूर्यवंशी उपस्थित होते. विद्यार्थिनी स्मिता माळी व श्वेता राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्नेहल कोरके हिने केले. आभार शालिनी हिने केले.

Solapur, Solapur-Today
17/01/2026 Page No. 2

लोकमत

# लोकमंगलमध्ये नर्सिंगचा शपथविधी सोहळा उत्साहात

**सोलापूर :** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान अंतर्गत लोकमंगल नर्सिंग कॉलेज, वडाळा येथे बी.एस्सी. नर्सिंग प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांचा लॅम्प लायटिंग व शपथविधी सोहळा पार पडला.

या कार्यक्रमास यशोधरा हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विजय देसाई, डॉ. साशी वली आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठानच्या सचिवा डॉ. अनिता ढोबळे या होत्या. यावेळी लोकमंगल कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. राणी मेहत्रे तसेच लोकमंगल नर्सिंग कॉलेज, वडाळाचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. बी.एस्सी. नर्सिंग प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांनी लॅम्प लायटिंग करून नर्सिंग सेवेची शपथ घेतली. या शपथविधीद्वारे विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा, करुणा, निष्ठा व व्यावसायिक नैतिक मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहल कोरके हिने आभार मानले.

Hello Solapur
Page No. 4 Feb 19, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# # क्विक Update

## विद्यार्थ्यांनी उभारला जलतारा प्रकल्प

सोलापूर : वडाळा येथील लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी श्रमदानातून जलतारा प्रकल्प उभारला. केवळ विद्यार्थ्यांनी पाणी जमिनीत जिरवण्यासाठी केलेल्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. लोकमंगल महाविद्यालय परिसरातील चिंचेच्या प्रक्षेत्रात ५ बाय ५ बाय ६ आकाराचा खड्डा खोदून मोठी, मध्यम व लहान दगडाचे थर टाकण्यात आले. प्राचार्य अमोल शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अजित कुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## 'लोकमंगल'मध्ये दिले योगासनाचे धडे

सोलापूर : वडाळा येथील लोकमंगल नर्सिंग कॉलेज, लोकमंगल फार्मसी कॉलेज आणि लोकमंगल ॲग्रिकल्चर कॉलेजमध्ये योग दिन साजरा करण्यात आला. यामध्ये लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार, लोकमंगल फार्मसी कॉलेजच्या प्राचार्या राणी मेहत्रे तसेच लोकमंगल ॲग्रिकल्चर कॉलेजचे प्राचार्य अमोल शिंदे यांनीही सहभाग घेतला. योग प्रशिक्षक गायत्री हजारे यांनी योगाचे महत्त्व सांगितले.